# मेट्रो ३ चे भुयारीकरण सुपरफास्ट

## कुलाबा - वांद्रे - सीप्झ मार्गाचे १७ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो - ३ मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. मेट्रो - ३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५३ किमी म्हणजेच १७ टक्क्यांहून अधिक भुयारीकरण पूर्ण झाले आहे. मेट्रो - ३ सारखे महत्त्वपूर्ण सार्वजनिक वाहतूक प्रकल्प राबवीत असताना हरित धोरणाचे कठोर पालन केले जाईल. पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील, असा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून करण्यात आला आहे.

**आपत्ती नियंत्रण कक्ष**

३३.५ किलोमीटर भुयारी मेट्रोची निर्मिती करणाऱ्या प्राधिकरणाचा पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज आहे. एकूण ४२८ जल - शोषण पंप आणि १५ तत्काळ सेवा वाहने यांचे आयोजन सात पॅकेजेससाठी आहे.



### ऐतिहासिक इमारतीखालून मार्ग

दक्षिण मुंबई परिसरातील फ्लोरा फाऊंटनसह अन्य ऐतिहासिक इमारतीखालून भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते. यासाठी कट अँड कव्हर आणि न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग या दोन्ही पद्धतीचा संयुक्तिक वापर करून हे अभियांत्रिकी आव्हान पूर्ण करण्यात आले. चर्चगेट आणि हुतात्मा चौक स्थानकादरम्यान असलेली व्यापारी केंद्र याद्वारे जोडली जातील.

### आता किती काम झाले?

| प्रकल्पाचे एकूण भुयारीकरण | स्थापत्यची एकूण (सिव्हिल वर्क) कामे पूर्ण झाली आहेत. |
|---|---|
| ९७% | ७९% |

### डेडलाइन काय आहे?

प्रकल्पातील विविध कामे सध्या प्रगतिपथावर असून, प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे. कोरोना महामारी, त्याचा होत असलेल्या प्रभाव व त्यावरील उपायांची अनिश्चितता यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल हे आता सांगणे अवघड आहे.

### कांदळवन बाधित

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पातील धारावी व बीकेसी स्थानकाच्या बांधकामासाठी एकूण १०८ कांदळवन बाधित झाले होते. त्या बदल्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे एकूण ८ हजार ८८८ कांदळवन रोपट्यांचे रोपण करण्यात येत आहे.

**१९ ऑगस्ट २०२०** - मिठी नदी खालील १.५ किमी लांबीचे भुयार पूर्ण करण्यात आले. टेराटॅक-निर्मित गोदावरी - ४ या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) द्वारे बीकेसी ते धारावी पर्यंतचे १.५ किमी अंतर पूर्ण केले.

**२ सप्टेंबर २०२०** - विधान भवन मेट्रो स्थानकाच्या साच्याचे काम पूर्ण करण्यात आले. यात तळाचा स्लॅब, मॅझेनाईन स्लॅब, कॉनकोर्स स्लॅब आणि छताचा स्लॅब या कामांचा समावेश आहे.

**२१ सप्टेंबर २०२० - टी १** (विमानतळ ) स्थानक येथे भुयारीकरणाचा ३१वा टप्पा पार पडला. पॅकेज - ६ च्या टेराटेक निर्मित तापी - १ या टनेल बोअरिंग मशिनद्वारे सहार ते टी - १ (आंतरदेशीय विमानतळ ) पर्यंतचे १.५ किमी अंतर ४४९ दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले. यासाठी एकूण १०८० रिंग्सचा वापर करण्यात आला.

**१६ ऑक्टोबर २०२०** - कुलाबा - वांद्रे - सीप्झ या मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या चर्चगेट ते हुतात्मा चौक येथील मेट्रो स्थानकादरम्यान असलेला बोगदा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. मेट्रो ३ च्या मार्गातील हे ३३ वे भुयारीकरण होते.